# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - १५२
## सभावृत्तांत

दिनांक- २.०२.२०१० वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार दिनांक २.०२.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती - सभापती
२. मा.भोंडवे गणेश तुकाराम
३. मा.पिल्ले राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी
४. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
५. मा.अशोक दशरथ सोनवणे
६. मा.जगदीश शंकर शेट्टी
७. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
८. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे
९. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
१०. मा.रामदास तानाजी कुंभार
११. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
१२. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
१३. मा.सौ.सुलोचना बबन बढे

याशिवाय मा.गायकवाड,मा.झुरे,मा.गावडे,मा.गायकवाड,मा.भोसेकर,मा.फडणीस, मा.पवार-सहा.आयुक्त,मा.राजदेरकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.काळे-नगरसचिव, मा.सावळे-अति. अधिक्षक अभियंता, मा.चव्हाण-अति.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्य. अधिकारी,मा.लोंढे-मुख्यलेखापाल, मा.जाधव,मा.निकम,मा.चिंचवडे,मा.थोरात,मा.सवणे,मा.खाबडे,मा.दुधेकर - कार्य. अभियंता,मा.चव्हाण-मुख्य आरोग्य अधिकारी,मा.फुगे - मुख्य आयातकर अधिक्षक, मा.जाधव - शिक्षणाधिकारी, मा.पोमण-संगणक अधिकारी,मा.सुर्यवंशी - कायदा सल्लागार,मा.पवार - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-</u>

विषय क्रमांक :- ५८) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुस्थापन अभियानांतर्गत (JNNURM) घनकचरा व्यवस्थापन व शहर स्वच्छतेकामी साहित्य खरेदीबाबत.

विषय क्रमांक :- ५९) नगरसचिव विभागाकडील "बोनस तथा सानुग्रह अनुदान" या लेखाशिर्षावरुन "मा.सभासद मानधन व सभाभत्ता" या लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणेबाबत - मा.नितीन ओव्हाळ, मा.रामदास कुंभार यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ६०) मौजे भोसरी येथील जागा माउली बहुउद्देशीय शिक्षण संस्थेस भाडयाने देणेबाबत..मा.रामदास कुंभार, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ६१) मानधनावर नेमणुक करणेबाबत..मा.सुरदास गायकवाड, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ६२) से.२५ प्राधिकरण येथील किर्ती विद्यालयास वर्ग भाडयाने देणेबाबत ..मा.सुरदास गायकवाड,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव..

--------------

दिनांक २७.१.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे विषय क्रमांक ५८,५९,६०,६१,६२,१,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,५१,५२,५३,५४,५५,५६,५७ या क्रमाने कामकाजाच्या बाबी विचारार्थ घेणेत येतील असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------------

ठराव क्रमांक- १०४७७ विषय क्रमांक :- ५८
दिनांक- २.२.२०१० विभाग-मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/५/कावि/४२/१० दि.२/२/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरीता जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुस्थापनांतर्गत (JNNURM) घनकचरा व्यवस्थापन व शहर स्वच्छतेकामी मंजुर झालेल्या अनुदानामधून सध्या आवश्यक लागणारे Compactor Unit with Vehicle-०७ नग हे साहित्य मे.महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ (M.S.S.I.D.C.) यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम निविदा दरानुसार त्यांचे समवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून खरेदी करण्यास व येणाऱ्या रक्कम रुपये २,७९,६१,५३५/- चे खर्चास व Tata Chassis M/s.M.S.S.I.D.C. यांचेमार्फत खरेदी करण्यासाठी उत्पादित कंपनी यांना अगावू धनादेश M/s.M.S.S.I.D.C. यांचेकडून १००/- चे स्टॅम्प पेपरवर इंडेमिनीटी बॉण्ड घेवून उत्पादित कंपनीच्या प्रचलित प्राईस लिस्टनुसार कॉम्पॅक्टर युनीट बसविणेकामी अगावू रक्कम अदा करणेस तसेच कॉम्पॅक्टर युनीट चासीवर बसविणेकामी मे.एम.एस.एस.आय.डी.सी. यांचेकडून राष्ट्रीयकृत बँकेकडील बँक गॅरंटी घेवून ७५% अगावू रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०४७८ विषय क्रमांक :- ५९
दिनांक- २.२.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.रामदास कुंभार यांचा प्रस्ताव...

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००९/प्र.क्र.१४८/नवि-२६ मंत्रालय, मुंबई-४०००३२ दिनांक २२ जानेवारी २०१० अन्वये महानगरपालिका सदस्यांचे मानधनामध्ये वाढ झालेली असल्याने मा.सदस्य यांना माहे जानेवारी २०१० चा मानधन फरक व माहे फेब्रुवारी २०१० चा मानधन सभाभत्ता अदा करणेकामी तरतूद कमी पडत असल्याने नगरसचिव विभागाकडील "बोनस तथा सानुग्रह अनुदान" या लेखाशिर्षावरुन "मा.सभासद मानधन व सभाभत्ता" या लेखाशिर्षावर र.रु.५०,०००/- (रु.पन्नास हजार) तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०४७९ विषय क्रमांक :- ६०
दिनांक- २.२.२०१०
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.रामदास कुंभार,मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

मौजे भोसरी येथील ‘माऊली बहुउद्देशिय शिक्षण संस्था’ या नावाची शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी संस्था कार्यरत आहे. सदर संस्थेसाठी भोसरी गावातील स.नं.१ मधील आ.क्र.४३० या जागेमधील १०,६८३ चौरस मीटर जागा, ९९ वर्षांच्या भाडे कराराने या संस्थेच्या नावे देण्यास व १०००/- रु. (एक हजार रु.) प्रति महिना भाडे आकारण्यास परवानगी देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०४८० विषय क्रमांक :- ६१
दिनांक- २.२.२०१०
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.सुरदास गायकवाड,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

खाली नमूद केलेल्या व्यक्तींस त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या पदी व मानधनावर सहा महिने कालावधीसाठी नेमण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | नांव | पद | र.रु. |
|---|---|---|---|
| १) | सावित्रा महादेव सोनवणे | आया | ५,०००/- |
| २) | अनुप गोपाळ सोनावणे | वॉर्ड बॉय | ५,०००/- |
| ३) | मोरे वैशाली भगवान | नर्स (GNM) | ५,०००/- |
| ४) | कु.मेचे मंगल शंकर | नर्स (GNM) | ५,०००/- |
| ५) | अनील खामकर | फायरमन | ५,०००/- |
| ६) | नेहा बी. कुरुमकर | कॉम्प्युटर ऑपरेटर | ८,०००/- |
| ७) | वामन ज्ञानदेव बरकडे | पशुधन पर्यवेक्षक | ६,०००/- |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०४८१ विषय क्रमांक :- ६२
दिनांक- २.२.२०१०
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.सुरदास गायकवाड,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

श्री.किर्ती विद्यालय (ली सोफीया एज्युकेशन सोसायटी) (शासनमान्य) से.२५ प्राधिकरण मराठी माध्यमिक शाळा असून १९९२ पासून मनपा माध्यमिक शाळांमध्ये सात वर्गांत चालविण्यात येत आहे. मनपा भाडेतत्वावर ७ वर्ग दिलेले असून त्याचे भाडे पूर्णपणे भरलेले आहे. सदर शाळेला पुढील १५ वर्षे कालावधीसाठी तळमजल्यावरील ७ वर्ग योग्य त्या भाड्याने/लीजने (शैक्षणिक कार्यासाठीचे) देणेस व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०४८२ विषय क्रमांक- १
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२४१/१० दि.११/१/१०
विषय - प्र.क्र.४४ यमुनानगरमध्ये प्रबोधनकार ठाकरे मैदानाजवळील रस्त्यांना इंटरलॉकिंग कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०४८३ विषय क्रमांक- २
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२४६/१० दि.११/१/१०
विषय - वॉर्ड क्र.५ मोरे वस्ती व चिखली येथे रस्त्याच्या कडेने गटर्स करणेबाबत...

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०४८४ विषय क्रमांक- ३
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२६९/१०दि.११/१/१०
विषय :- प्र.क्र.४४ यमुनानगर मध्ये ठिकठिकाणी स्थापत्य विषयक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०४८५ विषय क्रमांक - ४
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२५५/१०.दि.११/१/१०
विषय :- प्रभाग क्र.५१,५२,४४,४८,४,४२ मध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे व अर्धगोल गटर्स करणेबाबत...

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०४८६ विषय क्रमांक- ५
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२५७/१०दि.११/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.४ अन्वये, तळवडे रूपीनगर मधील मुख्य रस्त्याच्या कडेने स्टॉर्म वॉटर ड्रेन बांधणेकामी मे.छोटेलाल चौहान (नि.र.रू. ४६,२६,१६८/- [र.रू.शेहचाळीस लाख सव्वीस हजार एकशे अडुसष्ठ] पेक्षा ३४.६८ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३०,२१,८१३/- [र.रू.तीस लाख एकवीस हजार आठशे तेरा] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०४८७ विषय क्रमांक- ६
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२६८/१०दि.११/१/१०
विषय - प्र.क्र.४८ निगडी गावठाण मधिल ठिकठिकाणी इंटरलॉकींग कॉंक्रीट पेव्हिंग ब्लॉकची कामे करणेबाबत...

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०४८८ विषय क्रमांक- ७
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२२७/१०दि.११/१/१०
विषय :- प्र.क्र.४४ यमुनानगरमध्ये पावसाचे पाण्यासाठी ठिकठिकाणी आर.सी.सी.पाईप टाकणेबाबत..

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०४८९ विषय क्रमांक- ८
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२३९/१०दि.११/१/१०
विषय :- प्र.क्र.५,६,७,८ मध्ये मोकळया जागांना सिमाभिंत बांधणे, मुरुम टाकणे व किरकोळ दुरुस्तीची कामे करणेबाबत..

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०४९० विषय क्रमांक- ९
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२६०/१०दि.११/१/१०
विषय :- वॉर्ड क्र.३८ मध्ये आरएच ७१ ते आर एच एल सी दरम्यान रस्त्याच्या दोन्ही कडेने पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत..

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक -१०४९१ विषय क्रमांक- १०
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२३४/१०दि.११/१/१०
विषय :- संभाजीनगर येथे बसविणेत येणा-या छत्रपती संभाजी महाराज व सिंहाचे चवथ-याचे काम व सुशोभीकरण व अनुषंगिक कामे करणेबाबत..

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०४९२ विषय क्रमांक- ११
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२३१/१०दि.११/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.४९ अन्वये, आकुर्डी खंडोबामाळ येथे १२.०० मी. रुंदीच्या रस्त्याच्या कडेने शाळेच्या मैदानासाठी गॅलरी व हॉकर्स झोनसाठी किरकोळ दुरुस्ती व देखभाल करणेकामी मे.मयुरेश कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२३,३३,१८२/- [र.रू.तेवीस लाख तेहतीस हजार एकशे ब्यॅऐंशी] पेक्षा २४.९५% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१७,५१,०५३/-पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०४९३ विषय क्रमांक- १२
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/३३/१०दि.१६/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९/२००९-१० मधील अ.क्र.१० अन्वये, चिंचवड येथील आरक्षण क्र.२१३ सि.स.नं. ६२२/१ येथे शाळा इमारत बांधणेकामी मे.यशक असोसिएट्स (नि.र.रू.३०,८१,४००/- [र.रू.तीस लाख एक्याऐंशी हजार चारशे] पेक्षा ९.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२७,७३,५६८/- [र.रू.सत्तावीस लाख त्र्याहत्तर हजार पाचशे अडुसष्ठ] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०४९४ विषय क्रमांक- १३
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/३५/१०दि.१६/१/१०
विषय :- ई निविदा नोटीस क्र.१६ २००९ - १० मधील कामांचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत..

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०४९५ विषय क्रमांक- १४
दिनांक- २.२.२०१० विभाग- करआकारणी व करसंकलन
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कर/मुख्य/६/कावि/१२१७/१०दि.१५/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन :-

सन २०१०-२०११ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींचे शुल्क सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडुन करणेत आली असलीतरी सन २०१०-२०११ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींचे शुल्क सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे निश्चित करण्याऐवजी सन २००९-२०१० या वर्षाकरिताचे महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींचे शुल्काचे दर हेच सन २०१०-२०११ या वर्षाकरिता कायम ठेवण्याचे निश्चित करण्यास मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०४९६ विषय क्रमांक- १५
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२७७/१० दि.१९/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.४२ अन्वये, प्रभाग क्र.३८, ३९, ४०, ४१ मध्ये नव्याने विकसित होणाऱ्या भागाचे रस्ते खडीमुरुमाचे करणेकामी मे.आर.वाय.काटे (नि.र.रू.११,६७,१३२/- [र.रू.अकरा लाख सदुसष्ठ हजार एकशे बत्तीस] पेक्षा ३९.३९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.७,०७,३९९/- [र.रू. सात लाख सात हजार तीनशे नव्यान्नव] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर,

सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०४९७ विषय क्रमांक- १६

दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य

सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२७५/१० दि.१९/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.५६ अन्वये, प्रभाग क्र.३७, ४९, ५०, ५३, ५४, ५५ मध्ये नव्याने विकसीत होणाऱ्या भागाचे रस्ते खडीमुरुमाचे करणेकामी मे.आर.वाय.काटे (नि.र.रू.११,९४,६५२/- [र.रू.अकरा लाख चौऱ्यान्नव हजार सहाशे बावन्न] पेक्षा ३९.३९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.७,२४,०७९/- [र.रू. सात लाख चोवीस हजार एकोणऐंशी] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०४९८ विषय क्रमांक- १७

दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य

सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२७४/१० दि.१९/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.३० अन्वये, प्रभाग क्र.४८ महाराणा पुतळा ते एल.आय.सी. इमारती पर्यंतच्या रस्त्याला दुभाजक व पेव्हींग ब्लॉक बसविणे कामी मे.अे.आर.भोंडवे (नि.र.रू.२३,३२,१६४/- [र.रू.तेवीस लाख बत्तीस हजार एकशे चौसष्ठ] पेक्षा ३६.५० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१४,८०,९२४/- [र.रू. चौदा लाख ऐंशी हजार नऊशे चोवीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम

अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०४९९ विषय क्रमांक- १८
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/१३/१० दि.१८/१/१०
विषय :- ई निविदा नोटीस क्र.०४/०४ - २००९ - १० मधील कामांचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०५०० विषय क्रमांक- १९
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ /कावि/२७८/१० दि.१९/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.१३ अन्वये, अ प्रभागातील वॉर्ड क्रमांक २ मधील शिवाजी पार्क व महात्मा फुलेनगर येथील अंतर्गत रस्त्याचे साईड पट्‌ट्याचे खडीमुरुमाने रूंदीकरण करणेकामी मे.आर.वाय. काटे (नि.र.रू.११,८५,८०४/- [र.रू.अकरा लाख पंच्याऐंशी हजार आठशे चार] पेक्षा ३९.३९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.७,१८,७१६/- [र.रू.सात लाख अठरा हजार सातशे सोळा] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०५०१ विषय क्रमांक- २०
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/३क/कावि/१२/१० दि.१८/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे :-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२००९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, दापोडी वॉर्ड क्र.१०३ मधील जलनिःसारण नलिकांसाठी खोदलेल्या भागाचे

कॉक्रीट पेव्हींग व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.बरखा एन्टरप्राईजेस (नि.र.रू. १९,२१,५००/- [र.रू.एकोणीस लाख एकवीस हजार पाचशे] पेक्षा ३८.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- १०५०२ विषय क्रमांक :- २१

दिनांक- २.२.२०१० विभाग-आरोग्य

सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.राजेश पिल्ले

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमु/३/कावि/४७/१० दि.१८/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० अन्वये, ब प्रभाग कार्यक्षेत्रातील हॉटेल/कॅन्टींगवेस्ट गोळा करणे व वाहतुक करणेकामी मे.सिध्दीविनायक ट्रान्सपोर्ट [निविदा रकमेच्या १६.८० % कमी दराची प्रति वाहन प्रती दिन र.रू. १,४८५/- प्रमाणे एकुण र.रू.१०,८४,१३८/- [र.रू.दहा लाख चौऱ्याऐंशी हजार एकशे अडोतीस] ] यांचेशी कामाचा करारनामा करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. (नि.र.रू. १३,०३,०५०/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- १०५०३ विषय क्रमांक :- २२

दिनांक- २.२.२०१० विभाग- आरोग्य

सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.अशोक सोनवणे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमु/३/कावि/४६/१० दि.१८/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० अन्वये, क प्रभाग कार्यक्षेत्रातील हॉटेल/कॅन्टींगवेस्ट गोळा करणे व वाहतुक करणेकामी मे.सिध्दीविनायक ट्रान्सपोर्ट [निविदा रकमेच्या १८.२ % कमी दराची प्रति वाहन प्रती दिन र.रू. १,४६०/- प्रमाणे एकुण र.रू.१०,६५,८००/- [र.रू.दहा लाख पासष्ठ हजार आठशे] ] यांचेशी कामाचा करारनामा करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. (नि.र.रू. १३,०३,०५०/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- १०५०४ विषय क्रमांक :- २३
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/३८/१० दि.१९/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.३ अन्वये, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयासाठी ५ लाख लिटर क्षमतेची आर सी सी संपवेल बांधणेकामी मे.ओमेगा एंटरप्रायजेस (नि.र.रू.१३,८९,४००/- [र.रू.तेरा लाख एकोणनव्वद हजार चारशे] पेक्षा २०.०० % जास्त) (सन २००८-०९ ची दरसुची व चालू दराशी तुलना करता ४.४४ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५०५ विषय क्रमांक :- २४
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. स्था/नि/२ब/कावि/३९/१० दि.१९/१/१०
विषय- नि.नो.क्र.२९/१६५-२००७/०८ मधील कामांचे करारनामे करणेस मंजूरी मिळणे बाबत...

विषय क्रमांक २४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५०६ विषय क्रमांक :- २५
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/४०/१० दि.१९/१/१०
विषय- नि.नो.क्र.९/२-२००९/१० मधील कामांचे करारनामे करणेस मंजूरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक २५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५०७ विषय क्रमांक :- २६
दिनांक- २.२.२०१० विभाग- विद्युत
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.विद्युत/नि/१अ/कावि/२९/१० दि.१९/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.९/०९-१० मधील अ.क्र.७ अन्वये, चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र (नवे) येथे ॲटोमॅटिक फाइनबार स्क्रिनमॅट स्क्रिन बसविणेकामी मे.एस.एस. बी. इंजिनिअरिंग ॲण्ड ट्रेडींग कंपनी (नि.र.रू.१५,४८,६००/- [र.रू.पंधरा लाख आठ्ठेचाळीस हजार सहाशे] पेक्षा २६.८० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५०८ विषय क्रमांक :- २७
दिनांक- २.२.२०१० विभाग- विद्युत
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.विद्युत/नि/१/कावि/१५/१० दि.१९/१/१०
विषय- नि.नो.क्र.१०/१-०९/१० मधील कामांचे करारनामे करणेस मंजूरी मिळणे बाबत...

विषय क्रमांक २७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५०९ विषय क्रमांक :- २८
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/३०५/१० दि.२०/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.१२ अन्वये, वॉर्ड क्र.४ पुर्णानगर येथिल आर टी ओ ऑफीस पासून रॉयल असो इमारती पर्यंत रस्त्याचे खडीमुरूमाने रूंदीकरण करून बी बी एम पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.आर.वाय.काटे (नि.र.रू.४१,८३,००५/- [र.रू.एक्केचाळीस लाख त्र्याऐंशी हजार पाच] पेक्षा ३९.३९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२५,३५,३१९/- [र.रू. पंचवीस लाख पस्तीस हजार तीनशे एकोणीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे

बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५१० विषय क्रमांक :- २९
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/अअ/८/१० दि.१८/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड जोड रस्त्या शेजारील जागेत JNNURM अंतर्गत ६७२ झ ोपडपट्टी पुर्नवसन सदनिका बांधणेकामी ह्या पुर्वी अशाच स्वरूपाच्या प्रकल्पाकरीता निविदा [नोटीस क्र.८५/२००६-०७] मागविली असता वाहनतळ + ७ मजले अशा इमारत प्रकारास प्राप्त लघुत्तम मंजुर दर व अटी व शर्तीनुसार मे.बी.जी.शिर्के कंस्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि. हे एकमेव कंत्राटदार तयार असुन त्यांच्या कामाची प्रगती व वेग समाधानकारक असुन सदरचे लघुत्तम दर हे स्पर्धात्मक व वाजवी असल्याने प्रती गाळा उक्ती रक्कम रू.२,९८,९४०/- व निविदे मधील मोजावयाच्या कामासाठी निविदा दर ३२ % जादा व या मंजुर दराप्रमाणे ह्या प्रकल्पाची एकुण र.रू.२५.३७ कोटी होत असल्याने मे.बी.जी.शिर्के कंस्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि. कंपनीस सदर ६७२ सदनिकांचे काम दोन भागात विभागून (पॅकेज क्र.७ व ८) वर नमुद केलेल्या दरानुसार थेट पध्दतीने देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५११ विषय क्रमांक :- ३०
दिनांक- २.२.२०१० विभाग-आरोग्य मुख्य
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उशोप/कावि/४९/१० दि.१८/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

उपद्रव शोध पथकासाठी खाजगी वाहने घेणेकामी प्रस्तावात नमुद तीन वाहन पुरवठाधारकांना पुर्वीच्याच म्हणजेच प्रति वाहन प्रति दिन ६० किमी साठी र.रू.५९०/- व त्यापुढील प्रत्येक किमीसाठी र.रू.५/- या दराने दोन महिने कालावधीसाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास पुर्वीच्याच करारनाम्यानुसार कामकाज आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५१२ विषय क्रमांक :- ३१
दिनांक- २.२.२०१० विभाग- आकाशचिन्ह व परवाना
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/८/कावि/३१३/२०१० दि.२०/१/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

सध्या अस्तित्वात असलेल्या उद्योगधंदा परवाना फी चे दरपत्रक प्रपत्र अ, व्यवसाय परवाना फी चे दरपत्रक प्रपत्र ब व साठा परवाना फीचे दरपत्रक क मध्ये प्रस्तावासोबत सादर केलेले असुन प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र ड मध्ये नमुद केलेप्रमाणे उद्योगधंदा परवाना, व्यवसाय परवाना व साठा परवाना फीचे दर सध्या अस्तित्वात असलेल्या फीवर १०० % वाढीव प्रस्तावीत करून आकारणेस सुचविणेत आले असल्याने सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता उद्योगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी मध्ये सुचविणेत आलेप्रमाणे दरवाढीस मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली असली तरी त्याऐवजी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिताचे उद्योगधंदा,व्यवसाय,साठा परवाना फीचे प्रचलित दरात १० % वाढ सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता करणेस मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५१३ विषय क्रमांक :- ३२
दिनांक- २.२.२०१० विभाग- दुरसंचार
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दुरसंचार/१/कावि/२२/१० दि.२१/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

१५ विभागीय करसंकलन कार्यालयातील दूरध्वनीवर, कर वसुलीचे कामकाजासाठी माहे जानेवारी २०१० ते मार्च २०१० या कालावधी करिता मोबाईल सुविधा उपलब्ध करून देणेस व सध्याचे दुरध्वनी मासिक बिलात र.रू.५००/- (सध्याचे मासिक बिल + र.रू.५००/-) च्या वाढीव खर्चास तसेच त्यावरील खर्च सहा.मंडल अधिकारी यांचेकडून वसुल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५१४ विषय क्रमांक :- ३३
दिनांक- २.२.२०१० विभाग- दूरसंचार
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/१९/१० दि.२०/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

श्री.प्रविण तुपे, सह.शहर अभियंता (वि/यां) यांचे लॅपटॉप करिता मे.रिलायन्स वर्ल्ड यांचेकडील वायरलेस ब्रॉडबॅन्ड पुरविणेस व होणाऱ्या एकत्रित र.रू.१०,९५०/- चे खर्चास तसेच हायस्पीड युएसबी हार्डवेअर करिता र.रू.३५००/- प्रथम अदा करणेस मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांचकडून करणेत आली असली तरी सर्व नगरसदस्यांस लॅपटॉप मनपातर्फे मुंबई मनपा धर्तीवर उपलब्ध करून देणेत यावेत व त्याकामी येणारा खर्च अदा करणेत यावा अन्यथा श्री.तुपे व अन्य मनपा अधिकाऱ्यांस पण लॅपटॉप उपलब्ध करून देणेत येवू नयेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५१५ विषय क्रमांक :- ३४
दिनांक- २.२.२०१० विभाग- आकाशचिन्ह व परवाना
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. आप/३/कावि/२४६/१० दि.२१/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता अ, ब आणि क नुसार परिशिष्ठ अ मधील जाहिरात कराचे व परिशिष्ठ ब मधील परवाना फी / शुल्क यामध्ये (विलंब शुल्क वगळता) तसेच परिशिष्ठ क मधील जागा भाडे दर नमुद केलेले असुन सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता परिशिष्ठ ब मधील विलंब शुल्काची (अ.क्र.१५) आकारणी करताना १.१० % ऐवजी २ % प्रमाणे करणेकामी तसेच प्रोसेसिंग फी म्हणून नविन आकाशचिन्ह परवान्याकरिता र.रू.५००/- व नुतनीकरण परवान्याकरीता र.रू.२५०/- नव्याने आकारणी करणेकामी सुचविणेत आले असल्याने सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षा करीता आकाशचिन्ह जाहीरात कर, परवाना फी/शुल्क व जागा भाडे प्रस्तावा सोबतचे परिशिष्ठ अ, ब आणि क प्रस्तावित दरपत्रका प्रमाणे वसुली करणेस मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली असली तरी त्या दरपत्रकामधे " सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिताच्या जाहिरात कराचे दरात १० % वाढ सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता करण्याचा, जाहिरात फलकाच्या जागा भाडयात कुठल्याही प्रकारची वाढ न करण्याचा, प्रोसेसिंग फी म्हणून नवीन आकाशचिन्ह परवान्याकरिता र.रु. १०००/- व नुतनीकरण परवान्याकरिता र.रु. १००/- आकारण्याचा," फेरफार करुन त्यानुसारच्या सुधारित दरपत्रकाप्रमाणे वसुली करणेस मान्यता देणेत यावी

अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५१६ विषय क्रमांक :- ३५
दिनांक- २.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/३०८/१० दि.२२/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.४४ अन्वये, अ प्रभागातील स्थापत्य विषयक आकस्मिक कामे करणेकामी मे.वेदार्थ असोसिएट्स (नि.र.रू.२९,८७,८८१/- [र.रू.एकोणतीस लाख सत्याऐंशी हजार आठशे एक्याऐंशी] पेक्षा ३७.४३ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१८,६९,५१७/- [र.रू.अठरा लाख एकोणसत्तर हजार पाचशे सतरा] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५१७ विषय क्रमांक :- ३६
दिनांक- २.२.२०१० विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/९/कावि/६१/१० दि.२१/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

क्रीडा विभागाकरिता क्रीडा साहित्य खरेदी करणेकामी मे.हरीओम स्पोटर्स, सांगवी यांना बाब क्रमांक १ ते १०९ मधील एकूण ८९ बाबींचे र.रू.४,९९,७३५/- [र.रू.चार लाख नव्यान्नव हजार सातशे पस्तीस] चे क्रीडा साहित्य क्रीडा विभागांस पुरवठा करणेकामी आदेश निर्गत करणेत आले असल्याने या पुरवठ्यापोटी केलेल्या संविदेचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५१८ विषय क्रमांक :- ३७
दिनांक- २.२.२०१० विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मभां/९/कावि/६०/१० दि.२१/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विविध विभागांसाठी आवश्यक असलेले टेबल ग्लास, टेबल क्लॉथ, नेमप्लेट, बोर्डाचा पुरवठा करणेकामी मे.रेखा इंजिनिअरींग वर्क्स, चिंचवड यांना बाब क्रमांक १ ते १२ दर र.रू.१,०४,६५६/- [र.रू.एक लाख चार हजार सहाशे छपन्न] चे टेबल ग्लास, टेबल क्लॉथ, नेमप्लेट, नेमप्लेट पितळी व अक्रलिक तयार करून बसवून देणेकरिता पुरवठा आदेश निर्गत करणेत आले असल्याने या पुरवठ्यापोटी केलेल्या संविदेचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५१९ विषय क्रमांक :- ३८
दिनांक- २.२.२०१० विभाग- आरोग्य
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आ/२/कावि/४५/२०१० दि.२५/१/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान २००८-०९ अंतर्गत प्रत्येक प्रभागात १) अ प्रभाग १.वॉर्ड क्र.४- कृष्णानगर-प्रथम क्रमांक २.वॉर्ड क्र.५३-आकुर्डी गावठाण - व्दितीय क्रमांक २) ब प्रभाग १.वॉर्ड क्र.६६- दर्शन हॉल - प्रथम क्रमांक २.वॉर्ड क्र.२९ -अजमेरा कॉलनी- व्दितीय क्रमांक ३) क प्रभाग १.वॉर्ड क्र.३०- नेहरूनगर-प्रथम क्रमांक २.वॉर्ड क्र.२२- लांडेवाडी-व्दितीय क्रमांक ४) ड प्रभाग १.वॉर्ड क्र.९७-पिंपळेगुरव गावठाण-प्रथम क्रमांक २.वॉर्ड क्र.७२-अशोक थिएटर-व्दितीय क्रमांक याप्रमाणे प्रथम व व्दितीय क्रमांकाचे वॉर्ड निश्चित झाले असल्याने १.प्रथम क्रमांकाच्या वॉर्डास प्रत्येकी र.रू.१,००,०००/- फक्त २.व्दितीय क्रमांकाच्या वॉर्डास प्रत्येकी र.रू.५०,०००/- फक्त या प्रमाणे बक्षिसे जाहीर करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५२०  विषय क्रमांक :- ३९
दिनांक- २.२.२०१०  विभाग- क्रीडा
सुचक- मा.गणेश भोंडवे  अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/४/कावि/२३/१० दि.६/१/१०
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २०/१/२०१० ठराव क्र.२०

प्रस्तावात नमुद प्रमाणे मनपाच्या १३ व्यायामशाळा या सार्वजनिक संस्थांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास दिल्याचा करार, रकाना क्र.४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे संपुष्टात येत असल्याने रकाना क्र.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मुदतवाढ व रकाना क्र.६ मध्ये नमुद केल्या प्रमाणे सेवाशुल्क देउन मनपा व्यायामशाळा कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५२१  विषय क्रमांक :- ४०
दिनांक- २.२.२०१०  विभाग- क्रीडा
सुचक- मा.आशा सुर्यवंशी  अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/७/कावि/२०/१० दि.८/१/१०
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २०/१/२०१० ठराव क्र.२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आंतर शालेय विद्यार्थ्यांच्या ८ कला व गिर्यारोहण स्पर्धा आयोजनाकामी, विद्यार्थ्यांना द्यावयाचा खाउ (केळी/बिस्कीटे) खरेदी, कला व गिर्यारोहण पुस्तिका व चित्रकला स्पर्धेसाठी आवश्यक चित्रकला कागद ही कोटेशन नोटिस प्रसिध्द करुन, फ्लेक्स बॅनर, ट्रॉफीज, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्र छपाई इ.खरेदी क्रीडा विभागाचे मंजूर निविदा दरांनुसार खरेदी करणे, प्रेक्षागृह भाडे, पी.एम.पी.एम.एल. बस भाडे इ.कामी येणा-या अंदाजे एकुण र.रु. २,७०,६६४/- खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास व सदर खर्च क्रीडा निधी मधील वार्षिक क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५२२  विषय क्रमांक :- ४१
दिनांक- २.२.२०१०  विभाग- क्रीडा
सुचक- मा.जितेंद्र ननावरे  अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ- १) मा.प्रेमकुमार नायर, मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २०/१/२०१० ठराव क्र.२२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर येथील बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्र चालविले जाते. सदर बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्र हे “देवांग बॉक्सिग ॲण्ड सोशल ॲकॅडमी, पिंपरी ४११ ०१८” ही संस्था सेवाशुल्क तत्वावर १० वर्षे कराराने चालविणेस घेणेस तयार आहे. सदर संस्था,

कॅप्टन गोपाल देवांग हे आंतरराष्ट्रीय खेळाडु चालवित असून गोपाल देवांग हे अर्जुन पुरस्कार विजेते आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बॉक्सिग स्पर्धेत प्राविण्य मिळविले आहे. कॅप्टन गोपाल देवांग हे सध्या मनपाच्या क्रीडा विभागात बॉक्सिग मार्गदर्शक म्हणून मानधनावर कामकाज करित आहेत. त्यांना मनपाचे बॉक्सिग प्रशिक्षण केंद्र कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास दिल्यास मनपा परिसरातील बॉक्सिग खेळाडुंना मार्गदर्शन मिळून, शहरात अनेक बॉक्सिग खेळाडु तयार होण्यास मदत होईल. तरी मनपाच्या वतीने कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर, पिंपरी १८ येथे नव्याने सुरु करण्यात आलेले, बॉक्सिग प्रशिक्षण केंद्र हे देवांग बॉक्सिग ॲण्ड सोशल ॲकॅडमी, पिंपरी ४११ ०१८ या संस्थेस दरमहा सेवाशुल्क र.रु. २०,०००/- देवून १० वर्षे कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - १०५२३ विषय क्रमांक :- ४२
दिनांक- २.२.२०१० विभाग- क्रीडा
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ- १) मा.प्रेमकुमार नायर, मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २०/१/२०१० ठराव क्र.२३

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने एकुण ७ जलतरण तलाव चालविले जातात. मनपाकडुन प्रत्येक तलावावर १ लिपीक, ४ जिवरक्षक व २ सुरक्षारक्षकांची नेमणुक केलेली आहे. उन्हाळी सिझनमध्ये मनपा जलतरण तलावांवर मोठया प्रमाणात पोहणा-या नागरिकांची गर्दि होत असते. पोहणा-या नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उन्हाळी सिझन (माहे मार्च ते जून) या काळामध्ये ठेकेदारांकडुन जीवरक्षक उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. गतवर्षी जॉय स्पोर्टस क्लब, पिंपळे गुरव यांनी दरमहा प्रती जीवरक्षक रक्कम रुपये ४०००/- या दराने १४ जीवरक्षक पुरविले होते. त्यांनी पुरविलेले जिवरक्षक लाईफ सेव्हींग्ज प्रमाणपत्र प्राप्त होते. त्यामुळे मनपा चे ७ जलतरण तलावासाठी माहे मार्च ते जून २०१० या उन्हाळी सिझनकरिता जॉय स्पोर्टस क्लब, पिंपळे गुरव यांकडुन (जिवरक्षकांवर नागरीकांच्या प्रत्यक्ष जीवाचे रक्षणाची जबाबदारी असल्याने) दरमहा प्रति जिवरक्षक र.रु.७०००/- या दराने एकुण ३० जिवरक्षक उपलब्ध करुन घेणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.प्रशांत शितोळे  अनुमोदक : मा.राजेश पिल्ले

तळवडे जकात नाक्यावर झालेल्या हल्ला प्रकरणी उत्कृष्ट कामाबाबत श्री.गायकवाड यांना दोन वेतनवाढी देण्यास मान्यता दिलेली असतानापण त्या ठरावाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी झालेली नसल्यामुळे शुक्रवार दि.५/२/२०१० रोजी दु.२.०० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभापती :- शुक्रवार दि.५/०२/२०१० रोजी दुपारी २:०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे

----------

(ज्ञानेश्वर निवृत्ती भालेराव)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८